दाखल दिनांक : ०२/०१/२०१८
नोंदणी दिनांक : ०२/०१/२०१८
पारित दिनांक : ०५/०२/२०१९
कालावधी : वर्षे म. दि.
०१ ०१ ०३

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग वरुड, जिल्हा अमरावती
न्यायालय क्रमांक १ यांचे न्यायालयात.
(आर.एस.अडकिणे यांचे समक्ष)

**नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक ०१/२०१८.** **नि.क्र.२४**

महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलीस ठाणे अधिकारी,
शे'घाट, ता. वरुड,
जि. अमरावती. ......... **अभियोग पक्ष.**

// विरुध्द //

प्रविण सुरेश सराफ,
अंदाजे वय ४० वर्षे, धंदा मजुरी,
राहणार शे'घाट, ता.वरुड,
जि. अमरावती. ......... **आरोपी.**

**दोषारोप** : भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ या दंडनिय अपराधाकरीता.

---

श्री. महल्ले, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, अभियोग पक्षातर्फे.
श्री.आर.आर.रडके अधिवक्ता आरोपीं तर्फे.

---

**न्यायनिर्णय**
(घोषीत दिनांक ०५/०२/२०१९)

आरोपी हा भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ या दंडनिय अपराधाच्या दोषारोपास सामोरे जात आहे.

२. अभियोग पक्षाच्या प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दिनांक ०८/१२/२०१७ रोजी रात्री ९.०० च्या सुमारास तक्रारदार जिवन नारायणराव पोहरकर हे त्यांचा मित्र लिलाधर गणोरकर सोबत शेतात काम

करण्याकरीता मजुर सांगण्याकरीता मलकापुर येथील देशी भटट्ी जवळ गेले. तेथे आरोपी दारु पिवुन आला व त्यांना शिवीगाळ करु लागला. त्यानंतर तकारदार, प्रदिप व लिलाधर देशी भटट्ीत दारु पिण्याकरीता गेले. तेथे तकारदार पैसे देण्याकरीता गेले असता आरोपी त्याच्या हातात विळा घेवुन आला व त्यांना मारण्यास विळा उचलला. त्यावेळी तकारदार यांनी तो डाव्या हाताने अडविला असता त्या विळ्याचा वार त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर बसला व त्यामुळे ते जखमी झाले. सबब, तकारदार यांनी आरोपीच्या विरोधात पोलीस ठाणे शे'घाट येथे तकार दिली. तकार प्राप्त झाल्यानंतर पोलीसांनी घटनेचा तपास केला. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या तकारीच्या आधारे प्रथम वर्दी अहवाल नोंदवुन आरोपी विरुध्द वर नमुद कलमानुसार गुन्हा नोंदविला. तपासादरम्यान तपासी अंमलदार यांनी घटनास्थळी जावुन जप्ती व घटनास्थळ पंचनामा केला तसेच साक्षीदारांची बयाने नोंदविली. जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र मिळविले. तसेच आरोपी कडुन एक विळा जप्त केला व त्याबाबतचा जप्ती पंचनामा पंचा समक्ष तयार केला. तपासाअंती आरोपी विरुध्द वर नमुद कलमांच्या अपराधाकरीता दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

३. मी आरोपी विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ या दंडनीय अपराधाकरीता दोषारोप (नि.क.११) प्रमाणे निश्चित केले. आरोपीस त्याच्या विरुध्दचे दोषारोप मराठी भाषेत वाचुन व समजावुन सांगितले. आरोपीने दोषारोप कबुल केले नाही व खटला पुढे चालविण्यास विनंती केली.

४. आरोपीचे फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ३१३ नुसार निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव संपुर्ण नकारात्मक होता.

५. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.महल्ले तसेच आरोपी तर्फे श्री.रडके वकील यांचा युक्तिवाद ऐकला.

६. माझ्या विचारार्थ निघालेले मुददे् व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालील प्रमाणे देत आहे :-

| **मुददे्.** | **निष्कर्ष.** |
|---|---|
| १. दिनांक ०८/१२/२०१७ रोजी रात्री ९.०० वाजताचे दरम्यान ग्राम बालापेठ येथे आरोपीने तक्रारदार जिवन नारायणराव पोहरकर यांना विळयाने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोचविली, ज्यामुळे त्यांचा मृत्यु सुध्दा होवु शकत होता व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ नुसार दंडनिय अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | ................ नाही. |
| २. वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने तक्रारदार यांना सार्वजनीक शांततेचा भंग घडवुन आणण्याच्या उददे्शाने त्यांचा अपमान केला व त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ नुसार दंडनिय अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | ................ नाही. |
| ३. आदेश काय? | ....... अंतीम आदेशाप्रमाणे. |

## - कारणमिमांसा -

७. आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने तक्रारदार जिवन नारायणराव पोहरकर (सा.क्र.१) यांची निशाणी क्रमांक १६ नुसार साक्ष नोंदविली. तसेच तक्रारदार यांनी निशाणी क्रमांक १५ नुसार पुरसीस देवुन आरोपी सोबत आपसी समझौता झाल्याचे सांगितले व पुढे प्रकरण चालवायचे नाही असे नमुद केले. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुददा कमांक १ व २ च्या बाबतीत</u> :-**

८. जखमी तकारदार जिवन नारायणराव पोहरकर (सा.क.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगितले की, घटनेच्यावेळी त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे त्यांनी पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द रिपोर्ट दिला होता. परंतु त्यातील मजकुर माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने आरोपीच्या विरुध्द काहीही सांगितले नाही. त्यांनी अभियोग पक्षाला साथ दिली नाही. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांची उलट तपासणी घेतली असता त्यामध्ये अभियोग पक्षास उपयोगी पडेल असे काहीही मिळुण आले नाही. जखमी तकारदार यांनी त्यांचा जबानी रिपोर्ट तसेच प्रथम माहिती अहवालातील मजकुर कबुल केला नाही. त्याचप्रमाणे तकारदार यांनी पुरसीस (नि.क.१७)प्रकरणात दाखल करुन स्वतः असे नमुद केले की त्यांचा आरोपी सोबत आपसी समझौता झाला आहे. त्यामुळे त्यांना आरोपी विरुध्द प्रस्तुत प्रकरण पुढे चालवायचे नाही.

९. वर नमुद विवेचनावरुन या प्रकरणातील मुख्य पिडीत जखमी तकारदार यानेच अभियोग पक्षाला साथ दिली नाही. त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये आपसी समझौता झाल्याचे त्यांनी दिलेली पुरसीस (नि.क.१७) वरुन दिसुन येते. परिणामी, पुरेशा, सबळ, सुसंगत व विश्वासनीय पुराव्या अभावी अभियोग पक्ष आरोपी विरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे या निष्कर्षाप्रत मी येत आहे. त्यामुळे मुददा कमांक १ व २ चे निष्कर्ष मी **<u>नकारार्थी</u>** देत आहे.

**<u>मुददा कमांक ३ च्या बाबतीत</u> :**

१०. अभियोग पक्षाने आरोपीच्या विरोधात असलेले दोषारोप सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परिणामतः, मी खालील आदेश पारित करीत आहे :-

# **आदेश.**

१. आरोपीस भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ या दंडनिय अपराधाच्या दोषारोपातुन फौजदारी प्रकिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये, निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रदद् करण्यात येते.

३. जप्त मुदद्माल एक विळा किंमत अंदाजे रुपये २० अपील कालावधीनंतर जाहिर हर्रास करुन येणारी रक्कम सरकार जमा करावी.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

सही/

( आर.एस.अडकिणे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय कमाक १, वरुड

दिनांकः ०५/०२/२०१९